# SIAC, PITCs, YASHADA आणि PCMC द्वारे देण्यात येणाऱ्या निशुल्क नागरीसेवा परीक्षा प्रशिक्षण २०२३ करिता प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेची अधिसूचना

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत **राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (YASHADA) संचालित डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (एसीईसी ), पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) संचालित सावित्रीदेवी फुले अकॅडेमी, पुणे** मार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२३ साठी पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून इच्छुक पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहे.

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक:-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सुरुवात | शुक्रवार दि. ०४.११.२०२२ | सकाळी १०.०० पासून |
| २ | अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | शुक्रवार दि. २५.११.२०२२ | रात्री १२.०० पर्यंत |
| ३ | परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | शुक्रवार दि. २५.११.२०२२ | रात्री १२.०० पर्यंत |
| ४ | प्रवेश परीक्षा | रविवार दि. ०४.१२.२०२२ | सकाळी ११.०० ते दुपारी १.०० |

**टीप: -**

(१) विद्यार्थ्यांचे प्रवेश लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील कामगिरीच्या आधारे ठरवले जाणार असल्याने मुलाखतीचे वेळापत्रक परीक्षेनंतर जाहीर केले जाईल.

(२) सामायिक प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर लॉग इन-करून त्यांच्या पसंतीचे प्रशिक्षण केंद्र प्रवेशासाठी निवडावे.

(३) प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना कोणतीही माहिती वैयक्तिक रित्या उपलब्ध करून दिली जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेबद्दलची सर्व माहिती SIAC च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल .

**सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम, पात्रता, ऑनलाईन अर्ज भरण्याविषयी सूचना व इतर माहिती www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

दिनांक: ३.११.२०२२
स्थळ: मुंबई

sd/-
संचालक, SIAC, मुंबई
समन्वयक, सामायिक प्रवेश परीक्षा